महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004
EPABX : 0253-2539100-300, Phone : 0253-253917
E-mail : sw@muhs.ac.in Web.:www.muhs.ac.in

MUHS

डॉ. संदिप धों. गुंडरे
एम.बी.बी.एस., एम.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण

Dr. Sandeep D. Gundre
M.B.B.S., M.D
Director, Students' Welfare

मआविवि/एसडब्लु/स्कीम/८७३०/२०१८ दिनांक: २९/११/२०१८

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
डी. वाय. पाटील डेन्टल
कॉलेज,
पुणे

विषय : पुस्तक पेढी योजनेची अनुदान रक्कम आर.टी.जी.एस.केल्याबाबत...
संदर्भ : मआविवि/एसडब्लू /स्किम/३००/२०१८ दि.१२/०६/२०१८

महोदय,

वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठाने लागू केलेल्या पुस्तक पेढी योजनेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांकडून मागविण्यात आले आहेत. आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव उपरोक्त संदर्भीय पत्राव्दारे प्राप्त झालेला आहे. योजनेच्या अटी व शर्ती तसेच विद्यापीठाच्या प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रस्तावांची छाननी केल्यानंतर सदर योजनेचे अनुदान मिळणेकरीता आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव पात्र ठरला आहे.

त्याअनुषंगाने योजने अंतर्गत विद्यापीठाचे अनुदान रु. ३०,५००/- इतक्या रक्कमेचे आर.टी.जी. एस. दि.19/11/२०१८ रोजी महाविद्यालयाच्या बचत खात्यात जमा करण्यात आले आहे. सदर अनुदानातून महाविद्यालयाने विद्याशाखानिहाय महागडी पुस्तके खरेदी करुन, यापूर्वी पाठविण्यात आलेल्या योजना परिपत्रकात नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार अर्थिक दृष्ट्या दुर्बल/गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करावे. तसेच महाविद्यालयाने योजनेअंतर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी खालील नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन सदर पत्राच्या दिनांकापासुन दि. २८/०२/२०१९ पर्यत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे.

**पुस्तक पेढी योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.**

१) नोंदणीकृत पुस्तकालयातून खरेदी केलेल्या, पुस्तक संचाची मुळ देयके (Original Bills) व सुट दिल्याचा तपशिल.

२) पुस्तके खरेदी करण्यासाठी, कमीत कमी तीन नोंदणीकृत पुस्तकालयातून मागविण्यात आलेल्या पुस्तकांच्या यादीप्रमाणे त्यांच्या दरपत्रकांची ( Quotations ) प्रत्येकी एक प्रमाणे तीन मुळ प्रति.

D.Y.PATIL DENTAL SCHOOL
INWARD / OUTWARD
NO. DYPDS 1600
DATE: 10/12/18

PUNE

३) अनुदान रक्कमेच्या जमा खर्चाचा हिशोब सनदी लेखापालांकडून (Chartered Ac
परिक्षण केलेला मुळ अहवाल/प्रमाणपत्र.

४) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील, सनदी लेखापालांचे मुळ उपयोगिता प्रमा
(Original Utilization Certificate )

५) "सदर पुस्तके विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने उपयुक्त असून त्यांचे गरीब व ग
विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल " असे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे प्रमाणपत्र.

६) खरेदी केलेल्या पुस्तकांची नोंद ग्रंथालयात घेण्यात येऊन नोंदवहीची प्रत ची झेरॉक्स प्रस्तावासोब
जोडण्यात यावी.

७) रु. ५००/- ची ऑडीट फी ची मुळ पावती प्रस्तावासोबत जोडावी.

८) लाभार्थी विद्यार्थ्यांची नावे, प्रदान करण्यात आलेल्या पुस्तकांची तपशिल व संख्या व पुस्तके प्राप्त
झाल्याची विद्यार्थ्यांची स्वाक्षरी इ. मजकुर असलेली अधिष्ठाता/प्राचार्य यांची साक्षांकित यादी
प्रस्तावासोबत जोडावी

९) योजने अंतर्गत महाविद्यालयाने पुस्तके खरेदी न केल्यास सदर अनुदान रक्कम रु. ३०,५००/-
दि.२८/०२/२०१९ विद्यापीठास परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर राष्ट्रीयकृत बँके
प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

१०) पुस्तकपेढी योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास स
अनुदानाची रक्कम **"कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक"** यांच्या ना
नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाव्दारे विद्यापीठास दि.२८/०२/२०१९ परत करावी.

११) शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेचे देय
मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे.

<u>पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी करतांना पुढील सुचनांची नोंद घ्यावी.</u>

१) अनुदानाच्या रक्कमेतून तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्याशाखानिहाय आवश्यक असलेल्य
पुस्तकांचे संच नोंदणीकृत पुस्तकालयातून खरेदी करण्यात यावे व खरेदी करण्यात आलेल्या मु
बिलामध्ये पुस्तकालयाचे नाव, दुरध्वनी क्र. (एस.टी.डी. कोडसहीत ), पुस्तकाच्या किंमती
त्यावर सुट दिल्याचा तपशिल, पुस्तकालयाच्या मालकाचा सही व शिक्का यांचा स्पष्ट समावे
असणे आवश्यक आहे.

२) पुस्तके खरेदी करण्यासाठी, पुस्तकालयांकडून दरपत्रके (Quotations ) मागविताना पुस्तकालया
नाव, दुरध्वनी क्र. (एस.टी.डी. कोडसहीत), पुस्तकाच्या किंमती व त्यावर सुट दिल्याचा तपशिल
पुस्तकालयाच्या मालकाची सही व शिक्का यांचा स्पष्ट समावेश असणे आवश्यक आहे.

३) खरेदी केलेली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ठेवावी व सदर पुस्तके गरीब, गरजू व होतक
विद्यार्थ्यांना एक वर्षाच्या कालावधीसाठी वाटप करावी. योजनेचा लाभ देण्यासाठी महाविद्यालयाने
उपलब्ध पुस्तक संचाच्या प्रमाणात विद्यार्थीसंख्या निश्चित करुन त्याप्रमाणे पुस्तकांचे वाटप करावे.

४) पुस्तके सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असली तरी पुस्तकांची पाच वर्षापर्यंत जत
करण्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या ग्रंथपालाची असणार आहे. या पाच वर्षामध
पुस्तकांची दुरुस्ती/बाईडिंग यावर येणारा खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे. या खर्च रक्कमे
देयक मंजूर होणार नाही.

५) दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस सदर योजनेची पुस्तके वाटप करण्यासाठी महाविद्यालयांच्य
प्राचार्यांनी योजनेची प्रसिध्दी/परिपत्रक प्रदर्शित करावे व इच्छूक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवावे

प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन आर्थिकदृष्टया मागासलेल्या गरीब, गरजू, व होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करावे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता ठेवावी म्हणजे तक्रारी येणार नाही. तद्नंतरही तक्रार आल्यास महाविद्यालय स्तरावर तक्रारीचे निराकरण करावे.

६) विद्यापीठ अनुदान प्राप्त पुस्तकांवर खालील मजकूराचा गोल शिक्का बनवून स्टॅमपिंगकरणे आवश्यक आहे. या पूस्तकांच्या वाटपासाठी स्वतंत्र नोंदणी पुस्तक ठेवावे. विद्यापीठाच्या विविध तपासणी समिती व अधिकाऱ्यांना सदर नोंदणी पुस्तक तपासण्याचे अधिकार असेल याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
पुस्तक पेढी योजना
विद्यार्थी कल्याण विभाग

७) पुस्तक पेढी योजनेचा लाभ खरोखरच्या गरजू विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी मा. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी निरंतर संनियंत्रण ( Continuous Monitoring ) करणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.

कृपया आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच, उलट टपाली दयावी व योजनेतंर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी पत्रात नमुद केलेप्रमाणे कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन दि.२८/०२/२०१९ पर्यत विद्यापीठास पाठविणे अनिवार्य आहे.

धन्यवाद !

संचालक
विद्यार्थी कल्याण

सोबत :- वरीलप्रमाणे

D.Y. PATIL DENTAL SCHOOL
PUNE

महाविद्यालयाचे नाव :-.................................................................................

## पुस्तक पेढी योजना

पुस्तक पेढी योजने अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या पुस्तकांचे ग्रंथालयाचे ( Accession Register ) नोंदवहीत अ.क्र...... ते......... नोंद घेण्यात आली आहे.

ग्रंथपालाची सही व शिक्का

अधिष्ठाता/ प्राचार्याची स्वाक्षरी

महाविद्यालयाचा शिक्का

# पुस्तक पेढी योजनेचा जमा व खर्चाचा हिशोब

| जमा | खर्च | शिल्लक रक्कम |
|---|---|---|
| १)विद्यापीठ अनुदान<br>रु. ..............................<br>धनाकर्ष क्र.......................<br>दि. .............................. | रु. | रु. ...............<br>धनाकर्ष क्र. ............व<br>दि. ....................... |
| २) महाविद्यालयाचे रक्कम<br>रु. ...................... | रु. | रु. |
| एकूण | रु. | रु. |

सनदी लेखापालांचा सही व शिक्का

अधिष्ठाता/प्राचार्यांचा सही व शिक्का

D Y PATIL GROUP

# D Y Patil Dental School

संदर्भ : DYPDS /LIB /2018 - 19/ Date : 06/08/2018

प्रति,

प्र.कुलसचिव,

विध्यार्थी कल्याण, विभाग

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विध्यापीठ नाशिक,

विषय : ग्रंथपेढी योजनेचा प्रस्ताव २०१८ - १९

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ च्या अनुसूचित जातीतील विदयार्थ्यांनुरुप ग्रंथपेढी अनुदानाकरिता प्रस्ताव करीत आहोत.तरी स्विकारुन पोच द्यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

आनंद शिंगली

प्राचार्य

D.Y.PATIL DENTAL SCHOOL PUNE

D.Y.PATIL DENTAL SCHOOL
INWARD / OUTWARD
NO. DYPDS 1561
DATE: 6/8/18

D Y Patil Knowledge City, Charholi Bk, Via Lohegaon, Pune 412 105
Phone: (020) 6707 7780 . Fax (020) 6707 2718 Email:-barfiwala@dypic.in

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.
EPABX : 0253-2539100-300, Fax : 0253-2539171, Phone : 0253-2539169
E-mail : sw@muhs.ac.in Web.:www.muhs.ac.in

MUHS

डॉ. संदीप घों. गुंडरे
एम.बी.बी.एस.,एम.डी
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

Dr. Sandeep D. Gundre
M.B.B.S., M.D.
Director, Students' Welfare Dept.

मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/१११० /२०१८ दि.३१/०७/२०१८

- परीपत्रक -

प्रति,
मा.अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

विषय : विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरीता विद्यापीठाने लागू केलेल्या पुस्तकपेढी व बहि:शाल शिक्षण मंडळ योजनांबाबत..
संदर्भ : १) मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/३००/२०१८ दि.१२/०६/२०१८ (परीपत्रक)
२) मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/३०१/२०१८ दि.१२/०६/२०१८ (परीपत्रक)

महोदय/महोदया,

आपले लक्ष उपरोक्त संदर्भीय विषयाकडे वेधण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भीय परीपत्रकाद्वारे विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी लागू केलेल्या पुस्तकपेढी योजना व बहि:शाल शिक्षण मंडळ योजनांकरीताचे प्रस्ताव दि. ३१/०७/२०१८ पर्यंत मागविण्यात आले होते. तथापि या योजनांचा लाभ घेण्यास विद्यार्थी वंचित राहु नये याकरीता **प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत वाढवून दि. २०/०८/२०१८ अशी करण्यात आली आहे. सदर मुदतवाढीची नोंद घेऊन महाविद्यालयांनी प्रस्ताव दि. २०/०८/२०१८ पर्यंत** संदर्भीय **परीपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीनूसार विद्यापीठास प्राप्त होतील अशा प्रकारे पाठवावे.** तदनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. योजनांची अधिक माहिती विद्यापीठाच्या www.muhs.ac.in (Departments → Student's Welfare Dept. → Circular) संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग

D.Y. PATIL DENTAL SCHOOL PUNE